कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद
E-mail Id - gadzpaurangabad@gmail.com
संकेतस्थळ - http://aurangabadzp.gov.in/
दुरध्वणी क्रमांक ०२४०-२३२९७१४

जा.क्र.जिपऔ/2-प्रशासन/कावी/2022/1088 दिनांक 18/04/2022

प्रति,

1) खाते प्रमुख (सर्व), जिल्हा परिषद औरंगाबाद
2) गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)

**विषय :- सामान्य प्रशासन विभाग नियंत्रीत करीत असलेल्या वर्ग-3 संवर्गातील बदलीपात्र कर्मचाऱ्यांची वास्तव्य ज्येष्ठता यादी.**

संदर्भ :- 1) ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र. जिपब प्र.क्र. 112/आस्था-14 दिनांक 15.05.2014
2) शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-4816 प्र.क्र.16/आस्था-14 दिनांक 02.01.2017
3) शासन पुरकपत्र क्र.जिपब-4817/प्र.क्र.228/आस्था-14 दिनांक 07.03.2019

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. 1 अन्वये जिल्हा परिषदेतील गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या करण्याबाबत कालबध्द कार्यक्रम व निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग नियंत्रित करीत असलेल्या सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ट सहायक, कनिष्ट सहायक (लिपीक) व विस्तार अधिकारी (सांख्यिकी) संवर्गातील बदलीपात्र कर्मचाऱ्यांच्या वास्तव्य सेवाज्येष्ठता याद्या सामान्य प्रशासन विभागाच्या नोटीसबोर्डवर तसेच जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर (aurangabadzp.gov.in) प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

सदर यादीतील माहिती तपासून घेण्याकरीता वास्तव्य ज्येष्ठता यादी आपल्या कार्यालयातील संबंधीत आस्थापना लिपीक तसेच विभागातील व तालुक्यातील सर्व संबंधीत कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देऊन यादीवर संबंधितांची दिनांकीत स्वाक्षरी घ्यावी. माहितीबाबत आक्षेप / दुरुस्ती असल्यास दिनांक 27/04/2022 पर्यंत आवश्यक कागदपत्रासह सामान्य प्रशासन विभाग येथे निवेदने / हरकती / आक्षेप स्विकारण्यात येतील व त्यानंतर अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही. विलंबाची सर्वस्वी जबाबदारी आस्थापना शाखा व संबंधीत कर्मचारी यांची राहील.

वरीलप्रमाणे सर्व संवर्ग नियंत्रण विभागप्रमुख व पंचायत समिती स्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत अहवाल वेळोवेळी सादर करावा.

नीलेश र. गटणे, भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, औरंगाबाद
14.4.22